RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ४९(४)] सोमवार, ऑगस्ट १३, २०१८/श्रावण २२, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७.—** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-२ |

दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ ऑगस्ट २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

### महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९५६ चा ४९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०१८ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) मधील,— १९५६ चा ४९.

(क) पहिले परंतुक वगळण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामधील, "आणखी असे की " या मजकुराऐवजी, " परंतु " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) तिसऱ्या परंतुकामधील, " परंतु, आणखी असे की, " या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.